**प्रेम तुझे...**

रातीच्या गगनाला,
चंद्राचे वेड जसे -
प्रेम तुझे !

सारवल्या अंगणी,
प्राजक्त केशर ठसे -
प्रेम तुझे !

सूर्याची ऊब अन,
किरणांचे कवडसे -
प्रेम तुझे !

रणरणत्या मध्यान्ही,
वाऱ्याची झुळूकसे -
प्रेम तुझे !

सांजेच्या भरतीला,
मिठीत ये, म्हणतसे -
प्रेम तुझे !

अंधाऱ्या गाभारी,

तेवणारी ज्योतसे -

प्रेम तुझे !

जन्मांच्या फेऱ्यांतून,

श्वास-साथ देतसे -

प्रेम तुझे !!!

**- प्रीती देशपांडे**
http://www.meetipreeti.com